महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अमरावती

# Government Medical College, Amravati

District Woman Campus, Shrikrishna Peth, Amravati - 444601, M.S. (INDIA)

Telephone No. ०७२१-२९९३१७१ Website : www.gmcamravati.org

Email - gmcamravati@gmail.com 3469 GSTIN २७NSKD०८५५९F१DD

No.GMCA/PS/Quotation/Dean Vehicle/ /2026 Date:-28/07/2026

### महाविद्यालयीन संकेतस्थळावर खूले दरपत्रक प्रसिध्द करणे

### अधिष्ठाता यांना शासकीय कामकाजासाठी चारचाकी वाहन भाडेतत्वावर उपलब्ध करणेबाबत.

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-०९२४/प्र. क्र.३६८/प्रशा-२ तारीख: २३ सप्टेंबर, २०२४ अन्वये अधिष्ठाता यांना शासकीय कामकाजासाठी चारचाकी वाहन भाडेतत्वावर घेण्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदर प्रशासकीय मान्यतेनुसार Hyundai Xcent/Swift Desire/Honda Amaze/Toyota Etios या वाहनांपैकी कोणतेही ०१ वाहन भाडेतत्वावर घेता येईल तसेच त्यासाठी रू. ६,३६,०००/- (करांशिवाय) एवढ्या वार्षिक खर्चास (प्रती माह रू. ५३,०००/- करांशिवाय) मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. वरील प्रमाणे Hyundai Xcent/Swift Desire/Honda Amaze/Toyota Etios यां गाड्यांव्यतीरीक्त यापेक्षा उच्च प्रतिची गाडी शासनाने वरील नमुद ४ गाड्यांसाठी मान्य केलेल्या दरानुसार पुरवठादार पुरवठा करण्यास तयार असल्यास त्यांना प्राधान्य देण्यात येईल. करीता अधिष्ठाता यांना शासकीय कामकाजासाठी भाडेतत्वावर वाहन सेवा उपलब्ध करुन घेण्याकरीता पूरवठादार/निर्माते (उत्पादक) यांचे कडून खूले दरपत्रक मागविण्यात येत आहे. इच्छूक पूरवठादार/निर्माते (उत्पादक) खूले दरपत्रक या कार्यालयास सादर करु शकता.

दरपत्रका संबंधीचा सिलबंद लिफाफा स्वहस्ते अथवा पोस्टाने **दिनांक ०३/०८/२०२६ ला सायंकाळी ०६.०० पर्यंत** या कार्यालयात सादर करण्यात यावा.

दिनांक ०४/०८/२०२६ रोजी दूपारी २.०० वाजता या कार्यालयातील मा. अधिष्ठाता. यांचे दालनामध्ये दरपत्रक उघडण्यात येतील. पूरवठादार स्वत: उपस्थित राहू शकतात अथवा आपला प्रतिनिधी पाठवू शकतात.

१. "अधिष्ठाता यांना शासकीय कामकाजासाठी चारचाकी वाहन भाडेतत्वावर विषयक बाबीचे दरपत्रके" असा स्पष्ट उल्लेख बंद लिफाफ्यावर करण्यात यावा.
२. दरपत्रक अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय **अमरावती** यांचे नावाने या कार्यालयामध्ये पोहचता करण्यात यावा.
३. उशिराने प्राप्त झालेले दरपत्रक कोणत्याही परिस्थिती मध्ये स्विकारल्या जाणार नाही.
४. नमुद केलेल्या दरामध्येच वाहन सेवा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय **अमरावती** येथे सुरु करावे लागेल.
५. पूरवठादाराकडे पॅन नंबर, जीएसटी नंबर सह लेटरहेड वर दर नमुद करणे आवश्यक आहे. (पॅन नंबर, जीएसटी नंबर, सोबत जोडणे अनिवार्य असेल.)
६. वाहन अधिनियम १९८८ च्या कलम ६६ नुसार योग्य ते सर्व परवाने आवश्यक राहतील. वाहनांसंबंधी सर्व कागदपत्रे, GST नोंदणी प्रमाणपत्र, PAN Card, RTO कार्यालयाचे वाहन नोंदणी प्रमाणपत्र तसेच वाहनाचा विमा, पी. यु.सी. बाबतचे सर्व दायीत्यार्थी विमा पॉलीसी (Full Insurance) कागदपत्र, व ड्रायव्हर लायसन्स अद्ययावत असणे आवश्यक आहे. सर्व अद्ययावत दस्ताऐवजांची एक छायांकित प्रत पूरवठादार/निर्माते (उत्पादक) यांचे सही व शिक्क्यानिशी अधिष्ठाता कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती येथे जमा करावी.

७. पुरवठा करण्यात येणा-या चारचाही वाहना करीता इंधन, टोल, पार्किंग तसेच देखभाल व दुरुस्ती खर्च पुरवठा धारकाने करावयाचा आहे. भाडे तत्वावर घेण्यात येणारे वाहन सुस्थितीत ठेवणे आवश्यक राहील. त्याबाबत पूरवठादाराला कुठलीही सबब देता येणार नाही.

८. वाहन परवाना अद्ययावत असावे व वाहन चालवताना कायम जवळ बाळगणे बंधनकारक राहील. वाहन चालकास नियमीत गणवेश (खाकी ड्रेस किंवा पांढरा ड्रेस) असणे आवश्यक आहे. वाहनचालक/बदली बदली वाहन चालकाची संपूर्ण माहिती कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. तसेच वाहन चालकाचे चारित्र्य पडताळणी करुन प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

९. भाडयाने पुरवठा करण्यात येणा-या वाहनाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने संपूर्ण मापदंड पाळणे आवश्यक आहे (Fire Safety, Air Bags) इ. आवश्यक आहे.

१०. आपणांस नेमून दिलेले कामकाज मंजूर केलेल्या दराप्रमाणे व कार्यालयाने दिलेल्या सुचना व मार्गदर्शनानुसार करावयाचे आहे. अटी व शर्तीचा भंग केल्याचे निर्देशनास आल्यास व्यक्तीशः दंडात्मक कारवाईस पात्र असाल याची नोंद घ्यावी.

११. चारचाकी वाहन भाडेतत्वावर लावणेसाठी उक्त भाडयाने घेण्यात येणारे वाहन अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती यांना शासकीय कामकाजासाठी आहे.

१२. वाहन पुरवठाधारकाने मागणीनुसार वाहन मा. अधिष्ठाता यांनी मान्य केल्यानुसारच भाडेतत्वावर पुरवठा करावा लागेल. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती यांचे नियंत्रणाखाली त्यांचेकडून प्राप्त झालेल्या सुचनेनुसार ठरवून दिलेला बस पुरवठा प्रमाणिकपणे व निपक्षपातीपणे करणे बंधनकारक आहे.

१३. मनुष्यबळाअभावी अथवा दुसऱ्या कारणा अभावी वाहन भाडेतत्वावर पुरवठा करणेस व्यत्यय आल्यास तो अटी व शर्तीचा भंग मानला जावुन पुरवठाधारकावर उचित कारवाई केली जाईल.

१४. महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार संबधित दरास/ रकमेस वॅट व इतर शासकीय कर लागु होत असल्यास सदरचा कर वाहन पुरवठादाराने भरावयाचा आहे.

१५. दरपत्रक स्विकारणे अथवा कोणतेही कारण न देता नाकारणे हा अधिकार अधिष्ठाता यांनी स्वत: कडे राखून ठेवलेला आहे.

१६. पूरवठादारास आदेश प्राप्त होताच निर्धारीत वेळेत त्वरीत वाहनाचा पूरवठाकरणे बंधनकारक राहील. निर्धारीत वेळेत त्यांनी वाहनाचा पूरवठा न केल्यास त्यांना डिफॉल्टर म्हणून घोषित करण्यात येईल. त्यांचे सोबत या संस्थेकडून कुठलाही व्यवहार केल्या जाणार नाही. याबाबतीत अधिष्ठातांचा निर्णय अंतिम राहील.

१७. ठेकेदारास कोणत्याही प्रकारचे अग्रीम (Advance) देण्यात येणार नाही. काही कारणास्तव अनुदान उशिरा प्राप्त झाल्यामुळे देयकाची रक्कम अदा करण्यास विलंब झाल्यास तशी तयारी ठेकेदाराने ठेवणे आवश्यक राहील. काही प्रसंगी अनुदान उशिरा उपलब्ध झाल्यास ठेकेदारास इंधन वा तत्सम बाबीसाठी कोणतीही रक्कम आगाऊ (Advance) दिली जाणार नाही.

| अ.क्र. | सेवेचे नांव | प्रति माह दर करांशिवाय |
|---|---|---|
| १ | भाडेतत्वावर चारचाकी वाहन सेवा उपलब्ध करण्याबाबत | |

NRaut 24.7.26

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
अमरावती